POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-८५ ● मुंबई, मंगळवार, २८ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## तलाव, समुद्रात छठपूजेस 'मराठी एकीकरण समिती'चा विरोध

### नियम छाटपूजेसही लावण्याची केली मागणी

### उच्च न्यायलयाचा अवमान करणार आहात का

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**




उच्च न्यायालयाच्या निदेर्शानव्ये कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून तलाव, नदी आणि समुद्रात छठपूजा करण्यास मराठी एकीकरण समितीने विरोध दर्शवला आहे. पर्यावरण पूरक उत्सव होण्यसाठी उच्च न्यायालयाने गणेशोत्सव, नवरात्र उत्सवातील मुर्त्या, निर्माल्य तलाव आणि नदीत विसर्जित करण्यास मनाई केली होती. तसेच शाडू मातीच्या मुर्त्या स्थापन करण्याचे ही आदेश देण्यात आले होते. त्यासाठी वसई विरार महापालिकेने ही पर्यावरण वाचवा, प्रदूषण टाळा, स्वच्छता ठेवा, पाणी दूषित करू नका, निर्माल्य पाण्यात टाकू नका असा आदेशवजा सूचना केल्या होत्या. हेच नियम छाटपूजेसही लावण्यात यावे, अशी मागणी करून मराठी एकीकरण समितीने समुद्र, नदी, तलाव या ठिकाणी छटपूजा करण्यास विरोध केला आहे. तसेच वाहत्या पाण्यात देवाची पूजा करणारा छटपूजा सण तलाव आणि चौपाटीवर का, उत्तरप्रदेश, बिहारमध्ये समुद्र, तलाव नाहीत. मग महाराष्ट्रात येऊन चौपाटी आणि तलावाचा हट्ट का? उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य नाही का, परप्रांतीयांच्या सणांसाठी पर्यावरण, नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास आणि न्यायलयाचा अवमान करणार आहात का असे प्रश्न महापालिका आयुक्तांना विचारले आहेत. छठ पूजेदरम्यान फळे, फुलांचे हार, जुन्या मुर्त्या, दूध, तेलयुक्त पणत्या, जैविक साहित्य पाण्यात अर्पण केले जाते. हे साहित्य पाण्यात सडून अतिरिक्त पोषक द्रव्ये तयार करतात, ज्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनची पातळी कमी होते. परिणामी, मासे आणि इतर जलचर प्राण्यांचा जीव धोक्यात येतो. दरम्यान, महाराष्ट्रातील सणांना कायद्याचे निर्बंध आणि उत्तर भारतीय सणांना मुभा देऊन हिंदू सणांमध्येच भेदभाव करण्याचे काम आयुक्त मनोज सूर्यवंशी करत असल्याचा आरोप रुग्ण मित्र राजेंद्र ढगे यांनी केला आहे.

**अनेक वस्तूंमुळे जलचर प्राण्यांना अडकण्याचा धोका**

- भक्त प्लास्टिक पिशव्या, सिंथेटिक सजावट, कृत्रिम फुले, नारळ, मातीचे दिवे, थमाकील किंवा इतर प्लास्टिक वस्तू वापरतात, ज्या पाण्यात फेकल्या जातात किंवा वाहून जातात. हे साहित्य वषार्नुवर्षे पाण्यात राहते, ज्यामुळे जलचर प्राण्यांना अडकण्याचा धोका वाढतो आणि एकंदर पर्यावरणीय संतुलन बिघडते.
- पूजेदरम्यान वापरले जाणारे रंग, अगरबत्तीचे अवशेष किवा साबण स्नानामुळे होणारे प्रदूषण पाण्यात मिसळते. यामुळे पाण्याचे नैसर्गिक पोषक संतुलन बिघडते. असे मुद्दे मराठी एकीकरण समितीने मांडले आहेत.

## थॅलेसेमियाग्रस्त ५ मुलांना एचआयवीची लागण

### दूषित रक्त चढवल्याचा धक्कादायक आरोप... रुग्णालयाचा निष्काळजीपणा?

**■मुंबई । प्रतिनिधी,**

झारखंडमधील पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील चाईबासा येथील सदर रुग्णालयातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. थॅलेसेमियाने ग्रस्त असलेल्या किमान ५ अल्पवयीन मुलांना रक्त संक्रमणानंतर एचआयवीचा संसर्ग झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे राज्यात आरोग्य यंत्रणेची मोठी खळबळ उडाली असून, आरोग्य विभागाने उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे.

**फॉलो-अप चाचणीत धक्कादायक निकाल**

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, १३ सप्टेंबर रोजी रक्त संक्रमण झाल्यानंतर एका मुलाची १८ ऑक्टोबर रोजी फॉलो-अप चाचणी घेण्यात आली, तेव्हा तो लक्श पॉझिटिव्ह असल्याचे निष्पन्न झाले. या घटनेनंतर संबंधित मुलाच्या वडिलांनी रक्तपेढीतील तंत्रज्ञाविरुद्ध निष्काळजीपणाची तक्रार दाखल केली. माध्यमांमध्ये ही बातमी समोर आल्यानंतर, झारखंड उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आणि चौकशीसाठी झारखंड राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या पथकाला चाईबासा येथे पाठवले.




**आरोग्य प्रशासनाचा पुढील तपास**

उपायुक्त चंदन कुमार यांनी सांगितले की, या मुलांना दर १५ ते ३० दिवसांनी रक्त चढवले जात होते आणि प्रशासन सध्या तीन पातळ्यांवर तपास करत आहे. पुढील तपासणीत निकालाची खात्री करणे, रक्तदात्यांचा डेटाबेस तपासणे, संक्रमणाचे मूळ दूषित रक्तदात्यापासून आहे का, हे निश्चित करणे. ते म्हणाले की, पाचही मुलांचे रक्तगट वेगवेगळे असल्याने संक्रमण एकाच रक्तदात्याकडून नाही, तर विविध स्त्रोतांमधून झाले असण्याची शक्यता आहे.

**तपासात आणखी चौघांना एचआयवी**

२५ ऑक्टोबर रोजी आरोग्य सेवा संचालक डॉ. दिनेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सदर रुग्णालयाला भेट दिली. तपासादरम्यान आणखी ४ अल्पवयीन रुग्ण एचआयवी पॉझिटिव्ह आढळले, ज्यामुळे एकूण बाधित मुलांची संख्या ५ झाली आहे.

**तपासणीतील प्राथमिक निष्कर्ष**

डॉ. कुमार यांनी सांगितले की, प्राथमिक तपासणीत थॅलेसेमिया रुग्णांना दूषित रक्त देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तपासादरम्यान रक्तपेढीत काही विसंगती आढळून आल्या असून, त्या दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्जन डॉ. सुशांतो यांनीही सांगितले की, संसगार्ची कारणमीमांसा अद्याप सुरू आहे. "लक्श संसर्ग फक्त दूषित रक्तातूनच नव्हे, तर दूषित सुयांच्या संपकार्तून किंवा इतर घटकांमुळेही होऊ शकतो," असे त्यांनी नमूद केले.

## अवकाळीचा वादळी मारा सोसण्यासाठी तयार राहा! हवामान विभागाकडून नकोसा इशारा जारी...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

ऑक्टोबर महिन्यामध्ये एकाएकी तापमानवाढ झाली आणि या तापमानवाढीनं नागरिक बेजार झाले. इथं ही परिस्थिती असतानाच दुसरीकडे राज्याच्या बहुतांश भागांमध्ये वादळी पावसानं हजेरी लावल्यानं हा नेमका कोणता ऋतू सुरू आहे हाच प्रश्न आता अनेकांच्या मनात घर करु लागला आहे. प्रत्यक्षात मान्सूननं राज्यातूनच नव्हे तर देशातूनही माघार घेतली असली तरीही बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळं राज्यात पुन्हा एकदा पावसासाठी पोषक वातावरण निर्मिती होताना दिसत आहे. ज्या धर्तीवर प्रामुख्यानं विदर्भ आणि नजीकच्या भागांसाठी पावसाचा यलो अलर्ज जारी करण्यात आला आहे.

तर, रायगड जिल्ह्यात पावसामुळे नागरिकासह शेतकऱ्यांपुढंही अनेक अडचणी उभ्या राहिल्याचं पाहायला मिळत आहे. रायगडसह संपूर्ण कोकणात पुढच्या चार दिवसांसाठी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. दरम्यान हवामान खात्याच्या इशाऱ्यानंतर शेतकऱ्यांनी कापणीची कामंही थांबवल्याचं चित्र आहे. फक्त शेतकरीच नव्हे तर, मासेमारांनासुद्धा खोल समुद्रात न जाण्याचा सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**मुंबईपासून कोकणापर्यंत पाऊसमारा...**

प्रामुख्यानं पूर्व-मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं परिणामस्वरुप मुंब ईसह कोकणात येत्या पुढील ४ दिवस अर्थात ३० ऑक्टोबरपर्यंत अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या इशाऱ्याच्या धर्तीवर राज्याच्या काही भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहणार असून त्यांचा वेग ताशी ४० ते ५० किमी इतका असल्याचं सांगण्यात येत आहे. मराठवाड्यात पुढचे तीन दिवस पावसाच्या हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



## मद्यविक्रीचा परवाना नाही, तरी सुरु धंदा... पोलिसांकडून हॉटेल मालकाला धडा



**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मद्यविक्रीचा परवाना नसताना ग्राहकांना बेकायदेशिररित्या मद्यविक्री करणारे हॉटेल चालक मालक यांचेवर काशिमीरा पोलीस ठाण्याची कारवाई. अधिकमाहितीनुसार दिनांक २५/१०/२०२५ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत मुंशी कंपाउंड, मिरागाव येथील अड्डा बार अ‍ॅन्ड रेस्टॉरंट येथील दुसऱ्या माळ्यावर हॉटेलचे चालक मालक हे ग्राहकांना विनापरवाना दारु विक्री करुन सदर ठिकाणी ग्राहकांना दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन दिली असुन सदर ठिकाणी ग्राहक दारु पिवुन लाउड स्पिकरवर गाणी वाजवुन नृत्य करीत असल्याबाबत गुप्त बातमी प्राप्त झाली होती. सदर माहीतीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाणे व मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ मिरारोड यांचेकडील पथकाने संयुक्तपणे छापा कारवाई करुन हॉटेलचे चालक/मालक व ग्राहकांना दारु पुरविणारे वेटर असे एकूण ११ जणांना ताब्यात घेण्यात आले असून नमुद बारमध्ये विनापरवाना विक्रीकरीता ठेवलेल्या रेडलेबल, रॉयल स्टॅग, ऑक स्मित, ब्लेंडर प्राईड, कॅमिनो टकीला व इतर विदेशी मद्याच्या एकुण-१,१८,४५५/- रुपये किमतीच्या दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. नमुद हॉटेलचे चालक/मालक/वेटर असे एकूण ११ जणांविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. वरील कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. राहुल चव्हाण, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, मा. श्री. गणपत पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/श्रीराग कारंडे, पोउनि/संजय लोखंडे, सफी/विजय गंभिरराव, सफी/रणजित शिंदे, पो.शि/ विपुल सावंत, पो.शि/ लोखंडे, पो. शि/ बुल्हे, मपोशि/ सिता ठेंगडे नेमणुक-काशिमीरा पोलीस ठाणे तसेच सपोनि/राम सुरवसे, पोउनि/राजेंद्र निकम, पो.शि/चव्हाण, पो.शि/भोये यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

## २४ तासांत कारवाई! काशिमिरा पोलिसांनी शाळकरी मुलाच्या अपहरणाचा गुन्हा उकलला ,आरोपी जेरबंद!

**■मिरारोड। प्रतिनिधी,**

शाळकरी मुलाचे अपहरण करण्यासाठी खंडणीची मागणी केलेल्या आरोपीस काशिमिरा पोलीसांनी केले २४ तासांत जेरबंद. दिनांक २४/१०/२०२५ रोजी सेंट जोरम स्कुल, काशिगाव मधील एका शाळकरी मुलाचे आईला अनोळखी मोबाईल नंबर वरुन व्हॉटसअ‍ॅप मेसेज करून त्यामध्ये त्यांचे १४ वषार्चे लहान मुलास अपहरण करण्यात येईल असे वारंवार मेसेज करून धमकी देवून ४ लाख रुपये खंडणीची मागणी केली होती. नमुद महिला काशिमीरा पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यास आली असता, तीचे तक्रारीची तात्काळ दखल घेवून तपास चालु केला.

सदर बाबत प्रथम अनोळखी आरोपी याचा प्राप्त मोबाईल फोनची तांत्रीक माहिती मिळवून मोबाईल धारकास पोलीस ठाण्यात आणून सखोल चौकशी केली, परंतु उपयुक्त माहिती मिळत नव्हती. दरम्यान फियार्दी यांचेकडे अधिक चौकशी केली असता, त्यांचेकडून माहिती प्राप्त झाली की, अनोळखी आरोपी यांने त्यांना व्हॉटसअ‍ॅप द्वारे पाठवीलेला मुलाचा फोटो हा त्यांनी त्यांच्या मुलास शाळेतून सोडणे करीता स्कुल बस चालकास दिला होता. तात्काळ त्या स्कूल बस चालकास पोलीस ठाण्यात हजर केले. त्याचेकडे कौशल्यपूर्ण चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याचे निष्पण झाले तेव्हा गुन्हयाची उकल झाली की, स्कूल बस चालक सदानंद बाबुराव पत्री वय-३७ वर्ष, व्यवसाय स्कुल मिनी बस चालवीणे रा. रुम नं. ११, हरिराम सोसा. हनुमान मंदिराचे बाजुस, महाजनवाडी, काशिमीरा, मिरारोड याने प्रथम लहान मुलगा वय १४ वर्ष याचा फोटो त्याचे आईकडून प्राप्त केला होता. तसेच त्याचे मोबाईल व सिमकार्ड विक्रीचे दुकान असल्याने त्या दुकानात एक बिगारी इसम सिमकार्ड रिफील करणेस आला असता, त्याचे अज्ञानपणाचा फायदा घेवून त्याचे सिमकार्ड बंद झाल्याचे सांगून त्याचे कडचे सिमकार्ड स्वतः जवळ ठेवून त्सास जाणीव पूर्वक बंद झालेले सिमकार्ड देवून पाठवीले होते. त्या चालु असलेल्या सिमकार्ड नंबर वरुन फियार्दी यांना मुलाचे अपहरणाचे धमकीचे मेसेज व फोटो पाठवुन सदरचा गुन्हा केला होता. नमुद आरोपी याने त्याचे स्कुल बस मधुन पाल्यांना घेवून जाणारे आणखीन ३ ते ४ पालकांना असेच त्यांच्या मुलांचे धमकीचे व्हॉटसअ‍ॅप मेसेज पाठवून खंडणी मागण्याचा प्रयत्न चालु असतांना नमुद आरोपी यास तात्काळ जेरबंद केल्याने पुढचा अनर्थ टाळणेस काशिमीरा पोलीसांना यश आले आहे. नमुद आरोपीस पोलीसांनी दिनांक २६/१०/२०२५ रोजी अटक करुन केली असुन सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. राहुल चव्हाण, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०१, मा. श्री. गणपत पिंगळे, सहा. पो. आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उप निरी. शिवाजी खाडे, पो.उप निरी. राजेश किणी, पो.हवा./राहुल सोनकांबळे, पो.शि./ राजेंद्र सुर्यवंशी, पो.शि. राहुल पंडागळे, पो.शि./मुकेश कांबळे, नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे, पोहया/जयप्रकाश जाधव परिमंडळ-१ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

## २४ तासांत यश! घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार काशिमिरा पोलिसांच्या ताब्यात

**■भाईंदर। प्रतिनिधी,**



काशिमिरा - घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला २४ तासाच्या आत जेरबंद करण्यात गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमिरा यांना यश.अधिक माहिती नुसार फियार्दी श्री. मोईन ईजाज खान यांच्या राहते घरामध्ये दिनांक २४/१०/२०२५ रोजी दरम्यान एका अज्ञात चोरट्याने खिडकीवाटे घरामध्ये प्रवेश करून घरातील अंदाजे रु. ०२,१३,५००/- किंमतीचे सोने-चांदिचे दागिने, मोबाईल फोन च रोख रक्कम चोरी केली म्हणून तक्रार दिल्याने नयानगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मा. वरीष्ठांचे आदेशाप्रमाणे नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमिरा हे करीत असताना तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी यास निष्पन्न केले व गुप्त बातमीदारांकडुन त्याच्या ठावठिकाणाबाबत माहीती प्राप्त करून आरोपी बहरूल नुर इस्लाम तरफदार, वय २६ वर्षे, रा. भाईंदर फीरस्ता. मुळ रहीवाशी गाय भदुराई, जि. २४ परगना, राज्य पश्चिम बंगाल यास पोलीस पथकाने भाईंदर पश्चिम येथुन शिताफीने ताब्यात घेतले आहे.आरोपी विरुद्ध १.नयानगर पोलीस ठाणे,२.नवघर पोलीस ठाणे(एकूण ३ गुन्हे) असे एकूण ४ गुन्हे नोंद आहेत . आरोपी यास पुढील कायदेशीर कार्यवाहीकामी नयानगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष-१, काशिमीरा येथील प्रभारी पो.नि. सुशिलकुमार शिंदे, स.पो. नि. सचिन सानप, पो.उ.नि. उमेश भागवत, पो.उ.नि. संदिप शिंदे, स.फौ. अशोक पाटील, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, संतोष चव्हाण, पो.ह. मनोज चव्हाण, सचिन हुले, सुधीर खोत, स्वप्निल मोहीले, प्रशांत विसपुते, पो.शि./ धीरज मॅगाणे, सौरभ इंगळे, गौरव बारी व म.सु.ब. किरण आसवले यांनी केली आहे.

## मालाडमध्ये ८ वर्षांच्या चिमुकलीवर... घटनेनंतर सर्वत्र संताप!

**■मुंबई । प्रतिनिधी,**




मुंबईतील गुन्हेगारीने पुन्हा एकदा डोकं वर काढलं आहे. मालाडमध्ये ८ वर्षांच्या चिमुकलीवर फावड्याने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात चिमुकली गंभीर जखमी झाली आहे. या घटनेनंतर मालाड पोलिसांनी एफआयआर नोंदवून तपास सुरू केला आहे. शनिवारी दुपारी २ वाजका ही घटना घडली आहे. चिमुकलीवर झालेल्या या हल्ल्यानंतर आता सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

समोर आलेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी ३ वाजता ८ वर्षांची मुलगी तबेल्याजवळ खेळत होती. त्यावेळी ३४ वर्षीय अजय यादव हा या मुलीला चिडवत होता. चिडवल्यामुळे मुलीनेही त्याला बोलायला सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने शेण गोळा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्टीलच्या फावड्याने मुलीच्या चेहऱ्यावर हल्ला केला. या हल्यात मुलगी जखमी झाली आहे. त्यामुळे आरोपीवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

या घटनेनंतर मालाड पोलिसांनी एफआयआर नोंदवून आरोपीला ताब्यात घेण्यात आले होते. मात्र काही वेळानंतर पोलीसांनी आरोपींला सोडून दिले. त्यानंतर आज मनसे विभाग प्रमुख दिनेश साळवी यांनी आरोपीला अटक करण्याची मागणी केली होती. ते या मागणीसाठी कार्यकर्त्यांसह पोलीस ठाण्यात गेले होते. मात्र ते तिथे पोहोचण्यापूर्वीच पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे.

याबाबत बोलताना मनसे विभाग प्रमुख दिनेश साळवी म्हणाले की, 'पोलीसांनी ८ वर्षांच्या मुलीवर फावड्याने हल्ला करणाऱ्या आरोपीला नोटीस दिल्यानंतर सोडून दिले होते. मात्र आता पोलीसांनी सांगितले आहे की आरोपीला अटक करण्यात आली आहे आणि आरोपीविरुद्ध कलम ११८ भाग २ जोडण्यात येत आहे.'

## मुंबई पोलिसांच्या अँटी-नार्कोटिक्स विभागाची नालासोपाऱ्यात मोठी कारवाई

**असे सापडले धागेदोरे**

५ ऑक्टोबर रोजी मुंबई पोलिसांना माहिती मिळाली की एक माणूस कुर्ल्यात एमडी ड्रग्ज विकण्यासाठी येत आहे. तपास पथकाने त्याला अटक केली आणि त्याच्याकडून ५७.८४ ग्रॅम एमडी जप्त केले. त्यानंतर मुंबईतील टिळक नगर पोलीस स्टेशनमध्ये एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तपासात आरोपीच्या अनेक साथीदारांची नावे उघड झाली. त्यानंतर मुंबई आणि मिरा रोड येथून इतर चार आरोपींना अटक करण्यात आली. त्यांची चौकशी केल्यानंतर पोलिसांना कळले की पेल्हारमध्ये एक ड्रग्ज फॅक्टरी कार्यरत आहे. जिथून एमडी ड्रग्ज मुंबई आणि इतर महाराष्ट्रात पाठवले जाते. यानंतर, पोलिसांनी रविवारी पेल्हारमध्ये छापा टाकला आणि ६.६७५ किलो एमडी ड्रग्ज, कच्चा माल आणि ड्रग्ज उत्पादन उपकरणे जप्त केली.

**■वसई। प्रतिनिधी,**



मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ विरोधी कारवाया होत आहेत. रविवारी पहाटे (२६ ऑक्टोबर) नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार परिसरात असलेल्या अमली पदार्थांची(ड्रग्ज) निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर मुंबई पोलिसांच्या अँटी-नार्कोटिक्स विभागाने धाड टाकली आहे. यात सुमारे १३ कोटी ४४ लाख ५३ हजार ७०० रुपयांचे मेफेड्रोन नावाचे अमली पदार्थ आणि त्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

यात चार ड्रग्ज विक्रेत्यांचा आणि एका उत्पादकाचा समावेश आहे. सोहेल अब्दुल ररुफ खान, मेहताब शेरअली खान, इकबाल बिलाल शेख, मोहसिन कयुम सैय्यद, आयुबअली अबुबकर सिद्दीकी अशी आरोपींची नावे आहे. नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील रशीद कंपाऊंड परिसरात छुप्या मागार्ने मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थांची निर्मिती करणारा कारखाना चालविला जात होता. याची माहिती अमली पदार्थाच्या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान मुंबई पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार रविवारी पहाटेच्या सुमारास मुंबई पोलिसांच्या अँटी-नारकोटिक्स च्या पथकाने पेल्हार येथे कारखान्यावर छापा टाकला.


या कारवाई दरम्यान मेफेड्रोन नावाचा अमली पदार्थ तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, त्यासाठीचे साहित्य व काही तयार अमली पदाथार्चा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. जवळपास जप्त केलेल्या अमली पदार्थांची किंमत १३ कोटी ४४ लाख ५३ हजार ७०० रुपये इतकी असल्याचे सांगण्यात येत आहे.पोलिसांनी केलेल्या मोठ्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## अंधार फार झाला, पणती जपून ठेवा




भाऊबीजेच्या दिवशी आत्महत्या केलेल्या डॉक्टर युवतीच्या घटनेने संपूर्ण आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्टाचार, कंत्राटी पद्धतीचा शोषणकारी चेहरा आणि पोलिसांच्या अमानुष वर्तनाचे वास्तव उघड केले आहे. या घटनेतून समाजाने या व्यवस्थेतील अंधारावर प्रकाश टाकण्याची वेळ आली आहे. या सदरासाठी लेख लिहिण्याचा विचार करत असतानाच ऐन भाऊबीजेच्या दिवशी कोथरबन, पो. चिंचवन, ता. वडवणी, जि. बीड या गावातील एम.बी.बी.एस. झालेल्या अविवाहित डॉक्टर युवतीने, जी फलटण उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी डॉक्टर म्हणून कार्यरत होती, तिने स्वतःच्या हातावर आपल्या आत्महत्येचे कारण लिहून ठेवून आत्महत्या केली. उच्च विद्याविभूषित, स्वतंत्रपणे नोकरी करणारी, भाड्याचे घर घेऊन स्वतंत्र राहणारी ही तरुणी आपल्या आत्महत्येच्या कारणाच्या संदेशात लिहिते की, फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाल बदने यांनी एका केसमधील शवविच्छेदनाचा रिपोर्ट बदलण्यासाठी दबाव टाकला आणि वेळोवेळी बलात्कार केला, असे लिहिले आहे. या घटनेने अनेक प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्रातील आरोग्य सेवेमध्ये थेट आरोग्य विभाग म्हणून नेमणुका जवळजवळ नाहीतच. इन्फ्रास्ट्रक्चर आहे, परंतु तज्ञ माणसांच्या नेमणुका थेट सरकारकडून नाहीत आणि जे नेमलेले आहेत ते सरकारी यंत्रणेत फक्त सहीपुरते येऊन जातात. गलेलठ्ठ पगार आणि सगळ्या सोयी उपभोगतात आणि मोठ्या प्रमाणावर स्वतःची खासगी रुग्णालये, हॉस्पिटल्स चालवतात. सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयात केवळ आपले वैयक्तिक हॉस्पिटल्स आणि रुग्णालयांकडे रुग्ण वळविण्यासाठी उपयोगात आणतात. राज्यभर कार्यरत असणारी १०८ नंबरची ॲम्ब्युलन्स देखील थेट रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयामध्ये न नेता यांच्या खासगी दवाखान्यात घेऊन जातात. मुळातच कंत्राटी पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रुग्णवाहिका, त्यात तैनात करण्यात आलेले ड्रायव्हर्स, डॉक्टर्स आणि टेक्निशियन्स हेही कंत्राटीच असल्यामुळे ते रुग्णवाहिकेमध्ये रुग्ण घेतल्या घेतल्याच नातेवाईकांना घाबरवून सोडतात. सरकारीत रुग्ण नेऊ नका. तेथे स्वच्छता नाही, डॉक्टर नाही, मशिनरी नाही, औषधे नाहीत, तुमचा रुग्ण वाचणार नाही. त्यापेक्षा अमुकतमुक खासगी रुग्णालयात घेऊन चला, तेथे तज्ज्ञ डॉक्टर आहेत, असे मार्केटिंग करतात. त्याबद्दल त्यांना अमुकतमुक हॉस्पिटलकडून कमिशन मिळते पेशंट आणल्याबद्दल. संपूर्ण सरकारी आरोग्य व्यवस्था ही कंत्राटी पद्धतीच्या भरवश्यावर एसटी महामंडळाप्रमाणेच राज्यभर आजारी अवस्थेत कशीबशी तग धरून आहे. प्रशासनाच्या सर्वोच्च पदापासून ते शेवटच्या स्वच्छता कामगारांपर्यंत अनेक जागा रिक्त आहेत आणि बऱ्याच जागा या कंत्राटी पद्धतीने चालविल्या जात आहेत. त्यामुळे स्वतः लैंगिक हिंसेचा बळी पडलेल्या, आरोग्य यंत्रणेत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयातील एका तरुण महिलेला लैंगिक अत्याचारापासून कोणतेही संरक्षण मिळालेले नाही. या ग्रामीण रुग्णालयामध्ये लैंगिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारी समिती आहे. या समितीची आत्महत्येनंतर काय भूमिका आहे? त्यांनी या आत्महत्येची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. ही समिती प्रशासन आणि पोलीस यंत्रणेच्या दबावाखाली कार्यरत आहे किंवा कसे, याबाबतही चौकशी करण्यात यावी. सदर समिती ही सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे संरक्षण करण्यास अपुरी पडली आहे. अशा समितीच्या संदर्भात संबंधित कंत्राटदाराला आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणतेही प्रशिक्षण मिळत नाही. अशी घटना घडल्यानंतर त्याची संपूर्ण जबाबदारी त्या कंत्राटदारांकडे जाते, असे प्रशासनातून सांगण्यात येते. सदर युवतीला प्रशासनातील कामामुळेच दबाव आला, वाद झाला, तक्रार झाली, त्यामुळेच वेळोवेळी बलात्कार सोसावा लागला, असे तिच्या आत्महत्येच्या दरम्यान लिहिलेल्या संदेशावरून लक्षात येते. प्रशासकीय काम करीत असताना होणाऱ्या या प्रकारच्या छळाला आणि अत्याचाराला कंत्राटदार जबाबदार की प्रशासन हा वाद सुरू राहील. पण दरम्यान पोलीस निरीक्षक गोपाल बदने आणि पोलीस प्रशांत बनकर या कायद्याच्या रक्षकांनी एका तरुणीला आपले जीवन संपवण्यास भाग पाडले, ही वस्तुस्थिती आहे. एम.बी.बी.एस.पर्यंत शिक्षण घेतलेल्या तरुण मुलीचा हा दुर्दैवी अंत दुःखद म्हणण्यापेक्षा चीड आणणारा आहे. महिला डॉक्टर आणि पोलिसांमध्ये वाद सुरू होता. त्याबाबत अंतर्गत चौकशी सुरू होती. चौकशीदरम्यान तिने माझ्यावर अन्याय होतोय. मी आत्महत्या करीन, असे लेखी स्वरूपात कळविलेले होते. असे असताना वेळीच ठोस उपाययोजना करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल न केल्याने सदर तरुणीने आपले जीवन संपवले, असे दिसत आहे. नीतिशून्य आणि भ्रष्टाचाराने बरबटलेल्या लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या या व्यवस्थेत कंत्राटदाराच्या उपकारावर कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणारा हा तरुण कर्मचारी वर्ग व्यवस्थेचा बळी ठरतो आहे आणि दिवसेंदिवस गैरजबाबदार लोकप्रतिनिधी, मस्तवाल प्रशासन आणि पुढाऱ्यांच्या मदतीने कंत्राट घेणारे मुजोर कंत्राटदार अशा तिहेरी विळख्यात महाराष्ट्राचे शासन आणि प्रशासन अडकलेले आहे. कुंपण शेत खात आहे. कायद्याचे रखवालदार पोलीस यांना ना कायद्याची ना नैतिकतेची चाड राहिली आहे. इंग्रजांनी पोलिसांना जनतेचे शोषण करण्यासाठी मागे ठेवून गेले आहे, असे वाटावे इतके हे जनसामान्यांना पोलीस नडत आहेत. वेळोवेळी जनआंदोलन करून मिळवलेले कायदे हे जरी जनतेच्या हितासाठी असले, तरी चालवणारी यंत्रणा ही अन्याय करणाऱ्या धनदांडग्यांच्या, पुरुषी व्यवस्थेच्या दावणीला बांधली गेली आहे. पुरोगामी सुसंस्कृत महाराष्ट्रात त्यातही सावित्रीचे जन्मगाव असणाऱ्या सातारा जिल्ह्यात डॉक्टरीचे शिक्षण घेतलेल्या एका तरुणीला आत्महत्येचा निर्णय करावा लागतो आणि तोही कंत्राटदाराकडून आणि प्रशासनाकडून पाठबळ न मिळाल्यामुळे आणि कायद्याच्या रखवालदारांनी केलेल्या अत्याचारामुळे ही घटना घडते, हे लाजिरवाणे आहे. पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल होईलच आणि तो करावाच लागेल. बलात्कार आणि आत्महत्येला प्रवृत्त केले म्हणून गुन्हा दाखल झालाच पाहिजे. जामीन मिळता कामा नये. संबंधित व्यक्तीला त्वरित शिक्षा झाली पाहिजे यासाठी डॉक्टरांच्या आणि महिला डॉक्टरांच्या संघटनेने भूमिका घेतली पाहिजे. महिला संघटनांनीही पुढे आले पाहिजे. ही आत्महत्या नसून आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांनी घेतलेला हा बळी आहे, व्यवस्थेने केलेला हा एकाप्रकारे खूनच आहे. एका बाजूला मुलींचा जन्म आणि त्यांचे अस्तित्व याच आव्हान आमच्यासमोर उभे आहे. दुसऱ्या बाजूला पटसंख्या कमी आहे म्हणून बंद होऊ घातलेल्या शाळांमुळे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर झाला आहे म्हणून आम्ही चिंतित आहोत, तर तिसरीकडे शिक्षण घेतल्यानंतरही प्रशासनात काम करताना मुलींचे असे बळी जात असतील, तर अधिकच चिंतेत भर पडली आहे. धर्मांध, जात्यांध, स्त्रीविरोधी, बुरसटलेल्या भ्रष्टाचारी, नीतिशून्य व्यवस्थेने संपूर्ण 'गव्हर्नन्स' नावाची व्यवस्था पोखरली आहे. न्यायासनावर बूट उगारले जात आहेत. अशा निराशाजनक परिस्थितीमध्ये, अंधारलेल्या सामाजिक वातावरणात जनतेनेच सामूहिक शहाणपण दाखवून आपल्या हातातील पणती तेवत ठेवून आवाज उठवण्याची गरज आहे. सामूहिक शहाणपण दाखविण्याची गरज आहे. समस्त वाचकांना दिवाळीच्या शुभेच्छा देताना विनंती आहे ''अंधार फार झाला, पणती जपून ठेवा''.

# मुख्यमंत्र्यांचा विदर्भ औद्योगिक विकासाचा संकल्प

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरला नवे लॉजिस्टिक हब बनवण्याची घोषणा केली असून त्यात २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. यातील प्रमुख प्रकल्पाचा भूमिपूजन समारोह येत्या एक महिन्यात होईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या घोषणेचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.**



नागपूर हे देशाच्या हृदयस्थानी आहे. विशेष म्हणजे हे शहर रस्ते रेल्वे आणि हवाई वाहतुकीने देखील देशभरात जोडले गेले आहे. त्यामुळे मालवाहतुकीचे आदान-प्रदान करणारे हे प्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाते. अशावेळी इथे लॉजिस्टिक हब जर विकसित झाले, तर विदर्भाच्या विकासाला नवी चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार यातील प्रमुख प्रकल्प अमरावती मार्गावर समृद्धी मार्गानजीक ८५ एकर जागेवर एक्स. एस. आय. ओ. कंपनीचा लॉजिस्टिक पार्क अस्तित्वात आहे. याच्या बाजूलाच १०५ एकर जमीन खरेदी करण्यात आली असून तिथे सातशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे. १६ नोव्हेंबर रोजी या पार्कचे भूमिपूजन जवळपास निश्चित आहे. इथे ११५० कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. इथे जवळच आणखी एक ३०० कोटींचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून त्याचे कामही सुरू झाले आहे.

वर्धा जिल्ह्यात बुटीबोरी येथे ३० एकर जमीन खरेदी करण्यात आली असून येथेही २५० कोटींचा प्रकल्प साकारण्यात येत आहे. नागपुरात वर्धमान नगर येथे साडेचार एकर जमिनीवर २५० कोटींचा प्रकल्प साकार होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकारण्यात येत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. येथे उच्च दर्जाचे औद्योगिक साठवण आणि वेअर हाऊसिंग स्पेस निर्माण होणार आहे. मे महिन्यात राज्य सरकारबरोबर ५१२७ कोटींचा करार करण्यात आला. येथे प्रकल्पात स्मार्ट तंत्रज्ञान उच्च फ्लॉवर लोड क्षमता कार्यक्षम मटेरियल हँडलिंग सिस्टिम्स आणि इंटिग्रेटेड युटिलिटीज असतील अशीही माहिती देण्यात आली आहे.

हे बघता मुख्यमंत्री फडणवीस यांनी विदर्भाचा औद्योगिक विकास लवकरात लवकर करण्याचा चंग बांधला आहे असे दिसून येते. विदर्भाच्या मागासलेपणाची जेव्हा चर्चा होते तेव्हा मोठे उद्योग आले नाहीत आणि आले तर ते चालले नाहीत हा मुद्दा समोर येतो. फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळात नियोजन केले आणि आता ते त्याचे इम्प्लिमेंटेशन करीत आहेत असे दिसून येते आहे. विदर्भात नागपूरचा मिहान प्रकल्प फडणवीसांच्याच पाठपुराव्यामुळे पूर्णत्वास येतो आहे. मिहान पूर्णत्वास आले, तर हवाई वाहतुकीद्वारे मालाची ने-आण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे विदर्भातील कृषी उत्पादने आणि कृषी प्रक्रिया उद्योगात तयार होणारी उत्पादने जगभरात पाठवणे शक्य होणार आहे. शिवाय नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गही तयार झाला आहे. तो गोंदिया-गडचिरोली आणि चंद्रपूरपर्यंत विस्तारित करण्याचीही योजना कार्यान्वित होत आहे. या सर्वच परिसरात नवे नवे उद्योग आणण्यासाठी फडणवीस प्रयत्नशील आहेत. त्यांच्याच प्रयत्नाने नागपुरात सोलर डिफेन्सचा विस्तार होत असून त्यात ६८० कोटींची गुंतवणूक होणार आहे. कालच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या प्रकल्पासाठी २२३ एकर जमिनीचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

विदर्भात फक्त नागपूरच आहे असे नाही, तर उर्वरित जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी सुद्धा फडणवीसांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांच्याच संकल्पनेतून अमरावती येथे टेक्स्टाईल पार्क उभा होतो आहे आणि त्याला पूरक उद्योगदेखील उभे व्हायला सुरुवात झाली आहे. अमरावतीतून आतापर्यंत हवाई मार्गाने वाहतूक करायची तर नागपूरला यावे लागत होते. मात्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून अमरावतीत देखील विमानतळ उभे झाले आहे. त्याचबरोबर अकोल्यात असलेल्या विमानतळाचाही विस्तार करण्याची योजना त्यांनी हाती घेतली आहे. हे बघता विदर्भात आता नागपूरसह अमरावती-अकोला, चंद्रपूर आणि यवतमाळ येथे विमान वाहतूक करण्याची सोय झाली आहे असे म्हणता येऊ शकते. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील अत्यंत विकसित जिल्हा म्हणून ओळखला जात होता. परिणामी तिथे नक्षलवाद वाढला होता. मात्र फडणवीस यांच्या पुढाकाराने तिथे आता विकासकामे तर पूर्ण झालीच, पण लॉईड स्टीलच्या मदतीने मोठा प्रकल्प सुरू झाला आहे. त्याशिवाय जीएसडब्ल्यू प्रकल्पाचेही काम जोरात आहे. त्यांना ९००० एकर जमीन देण्याची व्यवस्थाही होत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रात समतोल औद्योगिक विकास व्हावा म्हणून आधीच्या सरकारने प्रत्येक जिल्ह्यात एमआयडीसी वसाहती उभ्या केल्या होत्या. याच योजनेत विदर्भात ९८ औद्योगिक वसाहती उभ्या केल्या. मात्र त्या सर्वच वसाहतींची आणि तिथल्या उद्योगांची अवस्था अतिशय दयनीय असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याची दखल घेऊन सरकारला निर्देशही दिले होते. याच स्तंभातून त्यावर प्रकाश टाकण्यात आला होता. मात्र फडणवीसांचे असे नियोजन राहिले आणि त्याला विदर्भातील सर्वच स्तरातील नेते संघटना आणि सामान्य नागरिक यांनी सहकार्याचा हात पुढे केला तर आपसूकच विदर्भाचा औद्योगिक विकास व्हायला सुरुवात होईल आणि उच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करण्याची गरजही लागणार नाही.

मात्र त्यासाठी प्रशासन राजकीय नेते आणि औद्योगिक संघटना यांच्यात समन्वय असायला हवा. समन्वयाने काम झाले, तर फडणवीस यांच्या स्वप्नातील औद्योगिक विकास अशक्य नाही. मुख्यमंत्री होण्याआधी देवेंद्र फडणवीस हे कट्टर विदर्भवादी होते. विदभार्चे वेगळे राज्य व्हावे यासाठी त्यांनी २०१०-११ मध्ये विदर्भात एक संपर्क यात्रा देखील काढली होती. विदर्भाचे वेगळे राज्य झाले तर ते कसे सक्षम राज्य म्हणून पुढे येऊ शकते यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी अभ्यासपूर्ण भाषणेही दिली होती. ते मुख्यमंत्री झाल्यावर जेव्हा त्यांना पत्रकारांनी विचारले तेव्हा वेगळ्या विदर्भाचा मी समर्थक आहे, मात्र मला आधी विदर्भ विकसित करायचा आहे असे उत्तर त्यांनी दिले होते. एक मुख्यमंत्री या नात्याने ती पावले उचलण्यास त्यांना निश्चित वाव होता. त्याचा उपयोग करत त्यांनी विदर्भात विकास करण्याचा प्रयत्न निश्चित केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वांची साथ मिळाली तर त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ शकतील असा विश्वास वैदर्भियांना वाटत आहे.

# सम्यक संकल्प




सम्यक संकल्प हे धीरोदात्त असतात. या संकल्पांमध्ये मूलगामी तत्त्वे आणि सैद्धांतिकता या गोष्टींचा समावेश आपल्याला आढळतो. संपूर्ण विश्वाचा डोलारा हा खरे तर मूलगामी सिद्धान्तावर आधारलेला आहे. सत्याला भिडणाऱ्या मानवी कल्पनांच्या दिशा या संकल्पांमधूनच आविष्कृत होत असतात. त्यामुळे सम्यक संकल्प म्हणजे विवेकी पद्धतीच्या विचारातून निर्माण होणारे संकल्प होत. हे सम्यक संकल्प अधिष्ठानपूर्वक विचारांचे असतात. त्या अधिष्ठानपूर्वक विचारांमधून योग्य मार्गाने चालण्याचा प्रवास सुचत जातो. अशा प्रवासात मग चुकीच्या गोष्टी बाजूला होत जातात. त्यामुळे गती आणि प्रगती याचा शोध पराक्रमाने आणि कष्टाच्या सातत्याने घेता येतो. या संकल्पांचा प्रवास म्हणजे महत्त्वपूर्ण असणाऱ्या कार्यपूर्तीची सूचना असे देखील म्हणता येईल. संकल्प हे शपथेसमान असतात. एखादे कार्य तडीस नेण्यासाठी, चांगले निर्णय घोषित करण्यासाठी आणि ध्येयबिंदूकडे झेप घेण्यासाठी संकल्प हे अतिशय महत्त्वाचे असतात. या संकल्पांमधून सगळ्या उद्दिष्टाची मांडणी होत असते. ही बाब लक्षात घेऊन संकल्पांचे महत्त्व, त्याचे वैशिष्ट्य जाणले पाहिजे. संकल्पांमुळे माणसाचा विकास होत जातो आणि माणसाला योग्य पद्धतीच्या मार्गाने प्रवास करता येतो. मानव समूहांची विवेकनिष्ठ संस्कृती ही संकल्पांमुळेच गतिमान होत जाते.

# ठाण्यातील तलावांमधील जैवविविधता जपण्याची गरज!



आजच्या घडीला ३७ तलाव ठाणे शहरात शिल्लक राहिले आहेत. यातील काही तलावांची अवस्था चांगली आहे,परंतु ज्या तलावांचा परिसर मोठा आहे, त्याच्या बाजूला अतिक्रमण आहे ते अतिक्रमण मोकळे करण्याचे प्रयत्न महापालिकेने सुरू केले आहेत. तर काही तलावांची पाण्याची गुणवत्ता खराब झाल्याने गुणवत्तेवरही प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. ठाणे महानगरपालिकेच्या वतीने तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सिव्हरेजचे पाणी तलावामध्ये जाऊ नये याचीही विशेष काळजी घेतली जात आहे. पाण्यातील जैवविविधता चांगली असल्याचे प्रदूषण विभागाचे म्हणणे आहे. पण वाढणारी अनधिकृत बांधकामे, झोपडपट्ट्या आणि तलावांमध्ये फेकला जाणारा कचरा हे मोठे संकट या तलावांवर आहे.

ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरात ६५ तलाव अस्तित्वात होते, परंतु आता यातील ३७ तलाव आता शिल्लक असून यातील पाच ते सहा तलावावर कोटींचा खर्च केला जात आहे. आजही इतर तलावाकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नसल्याचे आजही दिसत आहे. काही तलावाकडे त्याची डागडुजी करण्यास, पाण्याची गुणवत्ता राखण्यास, साफसफाई करण्यास पालिकेनं लक्ष दिले आहे. पण आजही काही तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. काही तलावांना झोपडपट्टीचा विळखा झाला आहे, तलावांचे संवर्धन विकासकांच्या हितासाठी केले जाते असे पर्यावरण प्रेमी सांगत आहेत. परंतु जे तलाव गायब झाले आहेत, त्यांचे काय? हा मोठा प्रश्नच पर्यावरणप्रेमींना पडला आहे. जे शिल्लक राहिलेले तलाव आहेत, त्यामधील काही तलावामध्ये आजही कपडे धुतले जात आहेत, सांडपाणी तलावात सोडले जात आहे, मोठ्या प्रमाणात मूर्तींचे विसर्जन केले जाते, यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती असल्याने तलावांच्या पाण्याची गुणवत्ता खराब होत आहे. यामुळे तलावाच्या जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे. यामुळे जे तलाव शिल्लक राहिले आहेत. त्यामध्ये तलावाच्या एका बाजूला मूर्ती विसर्जनाकरिता कृत्रिम तलाव पालिकेने करणे आवश्यक आहे. दरवर्षी कृत्रिम तलाव पालिकेच्या वतीने गणेशोत्सव काळात तयार केले जातात. यावर्षीदेखील पालिकेने मोठ्या प्रमाणात कृत्रिम तलाव तयार केले असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे.

आजच्या घडीला ३७ तलाव ठाणे शहरात शिल्लक राहिले आहेत. यातील काहीच तलावांची अवस्था चांगली आहे,परंतु ज्या तलावाचा परिसर मोठा आहे, त्याच्या बाजूला अतिक्रमण आहे ते अतिक्रमण मोकळे करण्याचे प्रयत्न महापालिकेने सुरु केले आहेत. तर काही तलावांची पाण्याची गुणवत्ता खराब झाल्याने गुणवत्तेवरही प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. ठाणे महानगरपालिकेच्या वतीने तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सिव्हरेजचे पाणी तलावामध्ये जाऊ नये याचीही विशेष काळजी घेतली जात आहे. यामध्ये काही वर्षांपूर्वी पाण्यातील बायोलॉजिकल ऑक्सिजनची पातळी तपासण्यात आली. यामध्ये २४ तलावांच्या पाण्याची तपासणी करण्यात आल्यानंतर १८ तलावांमध्ये पाण्याची गुणवत्ता चांगली असल्याचे निष्पन्न झाले. पाण्यातील जैवविविधता चांगली असल्याचे प्रदूषण विभागाचे म्हणणे आहे. पाण्याची गुणवत्ता वाढल्याने फडके पाडा तलाव, खारेगाव, मासुंदा, ब्रह्माला, उपवन तलाव, जेल तलाव, न्यू शिवाजी नगर तलाव यांचा समावेश आहे. आता शिल्लक असलेल्या तलावांमध्ये ब्रह्माला, उपवन, मासुंदा, कचराळी या तलावावर पालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो. ६५ तलाव ही ठाण्याची ओळख होती, मग उर्वरित तलावांचे काय झाले, जे स्थानिक ठाण्यात राहणारे पर्यावरण प्रेमी, नागरिक आहेत त्यांच्या म्हणण्यानुसार तलावांच्या ठिकाणी झोपडपट्टीने अतिक्रमण केले, तर काही ठिकाणी तलावाच्या ठिकाणी इमारती उभ्या राहिल्या आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या म्हणण्यानुसार ठाणे शहरात आता ३७ तलाव आहेत, अमृत-२ योजने अंतर्गत खारेगाव तलाव, हरियाली तलाव, न्यू शिवाजी नगर तलाव, तुर्फेपाडा तलाव, कौसा तलाव, कोलशेत तलाव, दातिवली तलाव, रायलादेवी तलाव, देसाई तलाव, ब्रह्माला तलाव, आंबेघोसाळे तलाव, कचराळी तलाव, रायलादेवी तलाव, कमळ तलाव, खिडकाळी तलाव, जोगिला तलाव या १५ तलावांची एकूण ५९.९४ कोटी रकमेची कामे महानगरपालिकेने हाती घेतली आहेत. यातील ५० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये तलावास संरक्षण भिंत, कुंपण भिंत, बैठक व्यवस्था, जॉगिंग ट्रॅक, पदपथ, रेलिंग, कारंजे, विद्युतीकरण, सुरक्षा व्यवस्थेवरही सीसीटीव्ही व साउंड सिस्टीम, जलशुद्धिकरण व्यवस्था, उद्यान विषयक काम करणे, झाडे लावणे, रंगरंगोटी करणे, आदी कामांचा समावेश आहे. यावर्षीच्या अखेरपर्यंत तलाव संवर्धन व सुशोभीकरणाकरिता २० कोटी रुपयांची तरतूद महानगरपालिकेने केली असल्याचे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सांगितले आहे.

राज्य सरोवर संवर्धन योजना अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील शीळ, खर्डी, गोकुळनगर, सिद्धेश्वर तलाव, तुर्फेपाडा तलाव व दिवा या ६ तलावांच्या संवर्धनाची कामे प्रस्तावित आहेत. या कामाच्या अंदाजे खर्च १५ कोटी १७ लाख रकमेस पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मान्यता दिली आहे. या प्रकल्पाकरिता शासनाकडून १० कोटी ६२ लाख रक्कम अनुदान स्वरूपात उपलब्ध होणार आहे. यातील ४ कोटी ५५ लाख रुपये महापालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार उपलब्ध करण्यात येणार आहेत. याचबरोबर शहरातील तलावांचे संवर्धन करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सांगण्यात आले. यामध्ये देसाई तलाव, फडकेपाडा तलाव, कासारवडवली तलाव, कावेसर तलाव, शिवाजीनगर तलाव, डायघर तलाव, जेल तलाव या ७ तलावांचे सीएसआर निधीतून संवर्धन करण्याचे काम सुरू आहे. घोडबंदर परिसरातील ओवळा येथे तीन तलाव होते, त्यातील एक तलाव आता लहान झालेले असल्याचे तेथील नागरिक सांगतात. ठाणे शहर म्हणून तलावांची ओळख आहे, मग शहरातील इतर तलाव कुठे गेले, असा प्रश्न पर्यावरण प्रेमींना पडत आहे.

ठाणे स्टेशनला कोणत्याही मार्गाने आलात तरी पहिले दर्शन घडते ते तलावांचे. मासुंदा, आंबे, घोसाळे, ब्रह्माळे, मखमली, कचराळी हे तलाव कॅसल मिल ते ठाणे रेल्वे स्टेशन या परिसरात शुद्ध व सुखद हवा देतात. ठाण्यातील वाढत्या प्रदूषणाला नियंत्रणात ठेवण्याचे काम चोखपणे करताना दिसतात. एके काळी शहरात ६५ तलाव व तितकीच मंदिरे या तलावांभोवती होती. आजघडीला ३७ तलाव ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत आहेत. त्यामुळे तलावांचे शहर किंवा तळेगाव म्हणून ठाण्याचे नाव शोभून दिसले असते, पण नावात काय आहे, असे ठणकावून पूर्वजांनी ठाणे नाव ठेवले ते बहुधा आपले ऐतिहासिक ठाणे पुढे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत भव्यदिव्य प्रगती करील हे भाकीत त्यांनी जाणले असावे. म्हणून आज ठाणेकर ह्यठाणे तेथे काय उणेह्न असे अभिमानाने बोलू लागले आहेत. यात तलावांची कमतरता नाही हे ओघाने आलेच. ठाण्यातील या सर्व तलावांचा शिरोमणी आहे मासुंदा तलाव. ठाण्याचे हृदय समजल्या जाणाऱ्या मासुंदा तलावाभोवती समस्त ठाणेकरांचे भावविश्व गुंफले गेले आहे. मासुंदा तलाव शिलाहार काळात बांधला असून त्याचे नाव 'मासवदा' असल्याचे इतिहासकार सांगतात. त्याभोवती असलेल्या मंदिरांमुळे येथे सांस्कृतिक व्यासपीठ तयार झाले. जे आजही ठाणेकरांनी जिवापाड जपले आहे. मासवदा ऊर्फ मासुंदा तलावाशिवाय याला महादेवाचा तलाव, शंकर तलाव, कौपिनेश्वर तलाव, तलावपाळी किंवा ठाण्याची चौपाटीदेखील बोलले जाते.

मासुंदा तलावाच्या कट्ट्यावर प्रेमिकांच्या गुजगोष्टींपासून जाहीर सभा-संमेलनापर्यंत, स्फुट काव्य-कथांपासून कादंबरी, नाटकापर्यंत आणि रिकामपणच्या वेळात कट्ट्यावरील गप्पा रंगतात. अशा अनेक गोष्टींच्या देवाणघेवाणीचा मूक साक्षीदार असलेल्या मासुंदा तलावाला ठाणेकरांनी आपल्या हृदयात महत्त्वाची जागा दिली आहे. अनेक कवी, लेखक, नाटककार, कलाकार यांच्या प्रतिभेला मासुंदाच्या कट्ट्यावर नवीन प्रेरणा मिळाली आहे. काहींनी आपल्या पुस्तकांचे व मासिकांचे प्रकाशन चांदणे शिंपित जाणाऱ्या चंद्राच्या साक्षीने मासुंदा तलावात नावेत बसून केले आहे. तर आजही काहीजणांच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर या मासुंदा तलावाचे चित्र असल्याचे दिसते.

तलावांची ओळख असणाऱ्या ठाणे शहराला लागूनच ३२ किलोमीटरचा खाडीचा किनारा आहे. तलावांचे अस्तित्व टिकविण्याकरिता पालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येतात. यामध्ये तलावांचे सुशोभीकरण करण्याबरोबरच पाणी शुद्धिकरणाकरिता यंत्रे बसविण्यात येतात. गणेश मूर्ती विसर्जनामुळे तलाव दूषित होऊ नये याकरिता कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येते. यामुळे गणेशोत्सवात नागरिकांनी कृत्रिम तलावामध्येच विसर्जन करावे, असे आवाहन देखील पालिकेच्या वतीने करण्यात येते. ठाण्याचे तलावाचे शहर ही ओळख ठाणेकर नागरिकांनादेखील भुरळ घालते. ज्या तलावांवर अतिक्रमण करून इमारती आणि अनधिकृत झोपड्या झाल्या आहेत, ते तलाव मोकळा श्वास घेतील का, असा प्रश्न ठाणेकर नागरिकांना पडत आहे. वाढते नागरीकरण पाहता ठाण्यातील तलावाचं क्षेत्र कमी होत चाललं आहे. यामुळे महानगरपालिकेने या तलावांची दुरवस्था दूर करावी. त्यांची जपणूक करून तलावांना मोकळा श्वास घेऊ द्यावा.

# व्हाइटहेड्स वर करा घरच्या घरी उपाय



तुमचा चेहरा तुम्ही कधी नीट आरशात निरखून पाहिला आहे का? तुम्हाला तुमच्या पोअर्समधून जर पांढरे काहीतरी आल्यासारखे वाटत असेल तर त्याला व्हाइटहेड्स असे म्हणतात. जर तुम्ही व्हाइटहेड्स कडे दुर्लक्ष केले तर ते पुढे जाऊन ब्लॅकहेड्स होतात. जर तुम्हालाही व्हाइटहेड्स चा त्रास असेल तर तुम्ही घरच्या घरी यावर काही उपाय करु शकता. तुमच्या किचनमधील काही गोष्टींचा वापर करुन तुम्ही तुमच्या चेहऱ्यावरील व्हाइटहेड्स पासून सुटका मिळवून क्लीअर त्वचा मिळवू शकता. आता सगळ्यांनाच हा त्रास असेल असे नाही. तुमची त्वचा जर मिश्र किंवा तैलीय असेल तर अशा त्वचेच्या व्यक्तींना हा त्रास हमखास होऊ शकतो. चेहऱ्यावरील पोअर्स मोठे झाल्यामुळे त्यात घाण जाऊन तुम्हाला व्हाइटहेड्सचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे तुम्ही त्याची योग्य काळजी घ्यायला हवी.

### ॲलोवेरा जेल

ऑईली त्वचा असणाऱ्यांसाठी ॲलोवेरा जेल एकदम बेस्ट आहे. तुमच्या चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी करण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. जर तुम्हाला कोणते मॉश्चरायझर लावायचे कळत नसेल तर तुम्ही तुमच्या चेहऱ्याला ॲलोवेरा जेल लावू शकता. त्यामुळे तुमचे मोठे पोअर्स काही काळासाठी बंद राहतील त्यामध्ये घाण जाणार नाही.

### अंड्याचा पांढरा बलक

अंड्याचा पांढरा बलक तुमच्या चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी करुन तुमच्या पोअर्समधील घाण काढण्यास



मदत करते. एक अंड घेऊन त्याचा पांढरा बलक वेगळा करा. वेगळा केलेला पांढरा बलक चांगला फेटून घ्या. बलक छान पांढरा झाल्यावर तो तुम्हाला तुमच्या चेहऱ्याला



किमान २० मिनिटे लावून ठेवायचा आहे. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने तुम्हाला धुवायचा आहे. आठवड्यातून किमान दोनदा तरी हा प्रयोग



करुन पाहा तुम्हाला तुमच्या चेहऱ्यामधील फरक जाणवेल.

### टी बॅग्ज

कोणत्याही टी बॅग्ज तुम्ही वापरल्यानंतर फेकून देता पण आता असे करु नका. कारण त्या तुमच्या त्वचेसाठी चांगल्या



असतात. वापरुन झालेल्या टी बॅग्ज तुम्हाला तुमच्या चेहऱ्याला लावायच्या आहेत. या टी बॅग्जचा तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो. तुम्हाला ओपन पोअर्सचा त्रास असेल तर तुमचे ओपन झालेले पोअर्स लहान होऊ शकतात. जर तुम्ही टी बॅग्ज वापरत नसाल तर तुम्ही तुमच्या रोजच्या चहाची पावडर देखील वापरु शकता. तुम्हाला उरलेल्या चहाची पावडर त्याचे घेऊन तुमच्या चेहऱ्याला चोळायची आहे.

### कडुनिंब आणि हळद

तुमच्या त्वचेवरील मुरुम घालवण्यासाठी कडुनिंब उपयुक्त आहे ते तुम्हाला माहीत असेलच पण अन्य समस्यांसाठीही कडुनिंब चांगले आहे. तुम्हाला कडुनिंब आणि हळद एकत्र करुन हा पॅक चेहऱ्याला लावायचा आहे. यामुळे तुम्हाला व्हाइटहेड्सचा असलेला त्रास कमी होईल

### हे टाळा

- काही जणांना केस धुवायला आवडत नाही. पण जर तुम्ही केस धुतले नाही. तर तुमच्या त्वचेवर तेल उतरुन तुम्हाला याचा त्रास होऊ शकतो.
- दिवसातून दोन वेळा फेसवॉश करायला अजिबात विसरु नका. तुमच्या त्वचेच्या प्रकाराला चांगला वाटेल असा फेसवॉश निवडा.
- जर तुम्हाला कोंड्याचा त्रास असेल तर तुम्ही त्यावर इलाज करुन घ्या. कारण कोंड्याचे रुपांतरच पिंपल्समध्ये होते.
- तुमच्या त्वचेवरील ओपन पोअर्स कमी करण्यासाठी तुमच्या चेहऱ्यावर अधूनमधून बर्फ चोळा.

# आंघोळ करताना या गोष्टींचा वापर कराल तर त्वचेच्या विकारांपासून होईल सुटका

ऑफिसला जाण्याच्या गडबडीत सगळ्यांनाच साग्रसंगीत आंघोळ करायला मिळतेच असे नाही.त्यामुळेच कावळ्याची आंघोळ करुनच कित्येकांना घराबाहेर पडावे लागते. या सगळ्या घाईमुळे शरीर स्वच्छ होतेच असे नाही. अशा वेळी शरीर स्वच्छ करण्यासाठी जर तुम्ही तुमच्या आंघोळीच्या पाण्यात काही गोष्टी घातल्या आणि आंघोळ केली तर तुम्हाला त्वचेसंदभार्तील कोणतेही विकार होणार नाहीत. या अशा गोष्टी आहेत ज्या घरात अगदी सहज उपलब्ध असतात. त्यांचा वापर करुन तुम्हाला फ्रेश तर वाटेलच शिवाय तुम्हाला तुमची त्वचा चमकदार, कोमल आणि स्वच्छ वाटेल.

### लिंबू

व्हिटॅमिन सी ने युक्त असलेल्या लिंबाचे भरपूर फायदे आहे. अगदी चेहऱ्यापासून ते पचनापर्यंतच्या अनेक समस्यांसाठी लिंबाचे सेवन केले जाते. तुमच्या त्वचेसाठीही लिंबू चांगला आहे. लिंबामध्ये असलेले ब्लिचींग एजंट तुमच्या त्वचेवरील घाण, अतिरिक्त मळ काढून टाकते. शिवाय तुमचे टॅनिंगही कमी करते. जर तुम्ही रोजच कोमट पाण्याने आंघोळ करत असाल तर तुम्ही तुमच्या पाण्यामध्ये अर्ध लिंबू पिळायला काहीच हरकत नाही. लिंबाच्या रसामुळे तुमच्या शरीरावरील मळ, चिकटपणा निघून जातो. तुम्हाला फ्रेशसुद्धा वाटते. या शिवाय त्वचेसंदर्भातील अन्य त्रासही दूर होतात जर तुम्हाला सकाळी वेळ नसेल तर घरी आल्यानंतर झोपण्याआधी आंघोळ करताना त्यात लिंबू पिळा. सकाळीही अगदी काहीच सेंकदात तुम्ही लिंबू पिळून त्या पाण्याने आंघोळ करु शकता.



### खडे मीठ

जर तुम्हाला दिवसभरात आलेला थकवा घालवायचा





असेल. तर खडे मीठ तुमच्यासाठी अगदी परफेक्ट आहे. खडे मीठ घातलेल्या पाण्यात आंघोळ केल्यामुळे तुम्हाला रिलॅक्स वाटते. ताणतणाव दूर होते. अंगदुखी बंद होते. या शिवाय मीठामुळे त्वचा मुलायम होते. त्यामुळे तुम्हाला ऑफिसमधून घरी आल्यानंतर अशाप्रकारे आंघोळ करायला काहीच हरकत नाही. गरम पाण्यात साधारण अर्धा ते १ चमचा मीठ घालून मीठ विरघळू द्या. या पाण्याने आंघोळ करा. शक्य असेल तर या पाण्यात काही वेळ बसलात तरी काहीच हरकत नाही. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी हा प्रयोग करुन पाहा.

### आलं

जर तुम्हाला सर्दी, ताप असा काही त्रास असेल तर तुम्ही आवर्जून आल्याच्या पाण्यात आंघोळ करायला हवी. आलं थोडसं ठेचून तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात घालायचे आहेत. तुम्हाला लगेचच आराम पडेल. जर तुमची त्वचा नाजूक असेल तर तुम्ही आलं वापरणं टाळा. कारण आल्यामुळे तुमची त्वचा जळू शकते. अगदी लहानला तुकडा ठेचून तुम्ही पाण्यात घालणे अपेक्षित असते.



### ग्रीन टी

ग्रीन टी चे भरपूर फायदे आहेत हे आपण जाणतोच. पण आंघोळीच्या पाण्यात तुम्ही ग्रीन टीचे पाऊच उघडून घातले तर तुमच्या त्वचेला त्याचा अधिक फायदा होईल. त्वचा टोन्ड करण्यासाठी ग्रीन टी ही उत्तम आहे. तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात ग्रीन टी घालायची आहे. तुम्ही ग्रीन टी चे मिळणारे सॅशे उघडून टाकले तर तुमच्या पाण्यात तुम्हाला पान दिसतील. त्यापेक्षा तुम्ही ग्रीन टीचे मिळणारे डीप डीप पाऊच पाण्यात घालून आंघोळ करा. साधारण आठवडाभरानंतर तुम्हाला फरक जाणवेल.

### ॲंटिसेप्टीक लिक्वीड

खूप लोकांना पाण्यात ॲंटिसेप्टिक लिक्विड घालून आंघोळ करायची सवय असते. तुम्हालाही बाहेरील धूळ मातीचा त्रास असेल किंवा तुम्हाला झटपट स्वच्छता हवी असेल तर तुम्ही तुमच्या पाण्यात ॲंटीसेप्टीक लिक्वीड घालू शकता. यामुळे तुमच्या शरीरावर कोणत्याही जखमा असतील तर त्यांच्यावरही हे ॲंटीसेप्टीक लिक्वीड चांगले काम करते. पूर्वी अनेक ॲंटीसेप्टीक लिक्वीड लहान मुलांच्या आंघोळीच्या पाण्यात टाकण्याचा सल्ला दिला जायचा. पण आता डॉक्टर अगदी तान्ह्या बाळांना हा सल्ला देत नाही. आता तुम्ही कावळ्याची आंघोळ करत असाल तरी शरीर अस्वच्छ राहण्याचे टेन्शन नाही. तुम्ही या वस्तूंचा वापर करुन स्वच्छ शरीरच नाही तर अन्य विकारांपासून मुक्ती मिळवू शकता.

# शरीरासाठी जास्वंदीचं फुल फायदेशीर आहे

१. **हाय ब्लडप्रेशर :** अमेरिकन हार्ट एसोसिएशनच्या एका संशोधनानुसार, जास्वंदीच्या पानांपासून बनलेला चहा उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराच्या रूग्णांसाठी औषधाचं काम करतो. हा चहा प्यायल्यामुळे हृदयप्रक्रिया सामान्य होते आणि शरीराला अतिशय हलकं वाटतं. तुम्हाला उच्च रक्तदाबाची समस्या असल्यास, दिवसातून कमीत कमी २ वेळा जास्वंदीचा चहा नक्की प्यावा.

२. **अनिमिया :** अधिकतर महिला रक्ता आणि लोहाच्या कमतरतेमुळे अनिमियाग्रस्त असतात. मात्र तुम्हाला आम्ही सांगू शकतो की, जास्वंदीच्या फुलांनी अनमियासारखे आजार बरे होतात. त्यासाठी एक महिना रोज दुधासह एक चमचा जास्वंदीची पावडर खाणं फायदेशीर ठरू शकतं.

३. **सर्दी, खोकला आणि कफ :** जास्वंदीचा चहा सर्दी, खोकला आणि कफने तुम्ही त्रस्त असल्यास, तुम्हाला या समस्येतून नक्कीच सोडवतो. वास्तविक यामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असल्यामुळे सर्दीसाठी हा चहा चांगला असतो.

४. **कोलेस्ट्रॉल :** जास्वंदीचा चहा आपल्या शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी योग्य राखण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. यामधील अस्तित्वात असणारे पोषक तत्व आपल्या धमनीतील नलिकांमध्ये पॅलेक्यू जमवण्यास रोखते. त्यामुळे आपल्या शरीरातील कोलेस्ट्रॉल नैसर्गिकरित्या कमी होते.



५. **मधुमेह :** जास्वंदीचा चहा हा मधुमेह असणाऱ्या रूग्णांसाठी औषध म्हणून खूपच फायदेशीर असल्याचं एका अहवालातून समोर आलं आहे. कारण जास्वंदीचा आंबट चहा हा शरीरामध्ये जाऊन कोलेस्ट्रॉल आणि टायग्लिरॉईड्सचं काम करतो जे मधुमेहासारखा आजार बरा करण्यासाठी फायदेशीर असते.

६. **मुतखडा :** तुम्हाला किडनी स्टोन अर्थात मुतखड्याची समस्या असल्यास, जास्वंदीचा चहा अतिशय योग्य आहे. यामुळे मुतखडा निघून जाण्यास मदत होते. यासाठी रोज जेवायच्या १ तास आधी हा चहा प्यावा.

७. **तोंड येणे :** बऱ्याचदा उष्णता शरीरामध्ये जास्त झाल्यास, तोंड येतं. असं झालं असल्यास, जास्वंदीची ४ ते ५ पानं चावून खावीत. त्यामुळे लाळ जास्त निर्माण होते आणि पचनशक्तीही वाढते.

# चेहऱ्यावर ना दिसणार सुरकुत्या ना वाढतं वय, जाणून घ्या सोपे घरगुती उपाय!



अनेकदा चुकीचे प्रॉडक्ट्स वापरल्यानेही सुरकुत्यांची समस्या होते. तसेच तणाव, धावपळ, चुकीचे खाणे-पिणे, पुरेशी झोप न घेणे, चेहऱ्याची स्वच्छता न ठेवणे, प्रदूषण यानेही चेहऱ्यावर सुरकुत्या येतात.

वाढत्या वयातही तुम्ही तरूण आणि सुंदर दिसू शकता, पण यासाठी तुम्हाला खाण्या-पिण्याकडे खास लक्ष द्यावे लागेल. तज्ञांनुसार, प्रोटीनयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने त्वचेवरील सेल्स वाढतात. याने स्कीन टिश्यू फिट राहतात. प्रोटीनयुक्त डाएट कमजोर पेशींना दूर करते आणि यामुळे सुरकुत्यांच्या समस्येपासून सुटका मिळते.

**प्रोटीनयुक्त डाएटने दूर करा सुरकुत्या :** तुम्हाला जर सुरकुत्यांची समस्या असेल तर प्रोटीनयुक्त डाएट त्वचेसाठी फार हेल्दी ठरते. प्रोटीन त्वचा तरूण ठेवण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावते. त्यामुळे आहारात प्रोटीनचा समावेश गरजेचा आहे.



**रावस मासे :** सॅल्मन फिश म्हणजेच रावस मासे खाणे तुम्हाला फायदेशीर ठरेल. यात ओमेगा ३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात असते. यात चिकनच्या बरोबरीत प्रोटीन आणि न्यूट्रिएंट्स असतात, जे शरीराला वेगवेगळे फायदे देतात. १०० ग्रॅम सॅल्मनमध्ये २० ग्रॅम प्रोटीन असते. सुरकुत्यांची समस्या दूर करायची असेल तर या माश्यांचे सेवन सुरू करा.



**कोलेजन प्रोटीन :** कोलेजन हे शरीरातील एक प्रोटीन आहे जे त्वचेला सुरक्षा प्रदान करते. यात प्रोलिन, ग्लायसिन आणि आर्जिनिनसारखे अमिनो ॲसिड असते. याने शरीराचे कनेक्टिव टिशूज निरोगी राखण्यास मदत मिळते. तुम्ही बाजारात सहजपणे या प्रोटीनचे पदार्थ मिळवू शकता. पण हे पदार्थ खाण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.



**ड्राय फ्रूट्स :** बदाम आणि अक्रोडसारखे ड्राय फ्रूट्स प्रोटीनचा चांगला स्त्रोत असतात. जर तुम्ही ५० ग्रॅम बदाम खाल तर तुम्हाला १० ग्रॅम प्रोटीन मिळेल. त्यासोबतच बदाम तुमचे कोलेस्ट्रॉल मेन्टेन ठेवण्यासही मदत करतात. याने हृदय निरोगी ठेवण्यासही मदत मिळते.

**एवोकाडो :** एवोकाडो एक सुपरफूड आहे जे फायटोकेमिकल्स आणि इतर महत्वपूर्ण पोषक तत्त्वांनी भरपूर असते. याने वय वाढण्याची गती कमी करण्यात मदत मिळते. एवोकाडोमध्ये ७३ टक्के पाणी, १५ टक्के चरबी, ८.५ टक्के कार्बोहायड्रेट आणि २ टक्के प्रोटीन असते.

अशात ड्रायफ्रूट्सचा आहारात नियमित समावेश करा. याने तुम्हाला सुरकुत्यांपासून सुटका मिळेल.




केवळ आरोग्यासाठीच नाही तर तुमच्या त्वचेसाठीदेखील या कॅमोमाईल टी चा तुम्ही उपयोग करून घेऊ शकता. तुम्हाला कदाचित हे फायदे माहीतही नसतील. चला तर मग जाणून घेऊ -

### जखमेवरील उपाय

तुम्हाला जखम झाल्यानंतर तुम्ही साधारणतः मलमाचा वापर करताच. पण तुम्हाला यावर कॅमोमाईल टी चा देखील वापर करता येऊ शकेल. रोमन्स, ग्रीक्स आणि इजिप्शियन्स लोक याचा जखम बरी करण्यासाठीदेखील उपोयग करतात. यामध्ये ॲंटीमायक्रोबायल आणि ॲंटीइन्फ्लेटरी गुण असल्यामुळे जखम लवकर बरी होण्यासाठी उपयोग होतो. तसंच सोरायसिसपासूनदेखील सुटका मिळवून देण्यासाठी याचा उपयोग होतो.

### त्वचा उजळवण्यासाठी होते मदत

यामध्ये नैसर्गिक त्वचा उजळवण्याचे घटक असून नैसर्गिक ब्लीच म्हणूनदेखील याचा वापर करता येऊ शकतात. तुमचं कॉम्प्लेक्शन उजळवून तुमची त्वचा अधिक चमकदार करण्यासाठी तुम्ही नियमित कॅमोमाईल टी वापरू शकता. याचा व्यवस्थित प्रमाणात वापर केल्यास, तुम्हाला कोणताही दुष्परिणाम जाणवत नाही. एक मात्र नक्की याचा वापर करून तुम्हाला नक्कीच जादूई त्वचा मिळू शकते. तुम्हाला नेहमी तुमच्या त्वचेवर जो ग्लो हवा असतो तो मिळू शकतो.

### ॲक्ने कमी करण्यासाठी होते मदत

ॲक्ने ही नेहमीच उद्भवणारी समस्या आहे. त्यावर उपचार करण्यासाठी आपण बरेच उपाय करत असतो. पण तरीही ही समस्या सतत उद्भवत आहे. तुमच्या चेहऱ्यावरील छिद्र नष्ट करण्यासाठीही याचा उपयोग होतो. यामध्ये आढळणाऱ्या ॲंटिसेप्टिक आणि ॲंटीइन्फ्लेमेटरी गुणांमुळे ॲक्ने कमी होण्यास मदत मिळते. तसंच याचा नियमित वापर केल्यास, तुमची ॲक्नेची समस्या दूर होण्यासदेखील मदत मिळते.

### ॲंटीएजिंग म्हणून होतो वापर

कॅमोमाईल टी मध्ये भरपूर प्रमाणात ॲंटीऑक्सिडंट्स आढळतात. जे तुमच्या त्वचेचं संरक्षण करण्यासाठी फायदेशीर असतात. फ्री - रॅडिकल डॅमेजपासून तुमच्या त्वचेचं संरक्षण करण्यासाठी याचा तुम्हाला फायदा मिळतो. तसंच तुमच्या त्वचेवरील छिद्र कमी करून एजिंग प्रोसेस कमी करण्यासाठीदेखील याचा उपयोग होतो.

### सूर्यकिरणांपासून करतं बचाव

सूर्यकिरण तुमच्या त्वचेला सर्वात जास्त नुकसान पोहचवतं. त्यासाठी तुम्हाला वेगवेगळ्या क्रिम्सचा वापर करावा लागतो. पण कॅमोमाईल टी च्या ॲंटीऑक्सिडंट्स आणि ॲंटीइन्फ्लेमेटरी गुणांमुळे याचा तुमच्या त्वचेला अधिक फायदा मिळतो. यासाठी तुम्ही कॅमोमाईल टी बनवून घ्या. त्यामध्ये टॉवेल भिजवा आणि पाणी पिळून टाका आणि तुमच्या सनबर्न झालेल्या त्वचेवर लावा. असं केल्याने तुमची बर्न झालेली त्वचा उजळण्यास नक्कीच मदत होते.

# जेवणाची चव वाढविणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढविणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफूलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत.

१. **वाढत्या वयाची लक्षणं थांबविण्यासाठी :** वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करुन वाढत्या वयाच्या खुणा लपविण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपविण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटामिन ‘ए’ आणि ‘सी’ चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असतात. त्यासोबतच त्यात ॲंटी ऑक्सिडेंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रेडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूलामध्ये असते.

२. **सर्दी–खोकल्यावर गुणकारी :** कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतरही लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफूलमध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढविण्याचं काम चक्रीफूल करते.



३. **पचनक्रिया सुधारते :** उशीरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खालल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होता. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफूलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफूलाचा समावेश करायला हवा.

## सुक्कू यादव हाच काशीमिरातील डाचकुलपाडा हाणामारीचा मास्टरमाइंड!
# सुक्कू यादवची दादागिरी वाढल्याचे स्थानिकांचा आरोप

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

काशीमिरातील डाचकूल पाड्यात दिवाळी कालावधीमध्ये तुफान हाणामारीची घटना घडली होती. या घटनेच्या मास्टर माइंडचे नाव सुक्कू यादव असून हा भाजपचा पदाधिकारी असल्याचे सांगत पोलीस प्रशासनाकडून सुक्कू यादव याच्या विरोधात कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याने स्थानिकांचे म्हणणे आहे. मिरारोडमधील डाचकुलपाडा परिसरात दोन गटात हाणामारी झाली. यावेळी ५० पेक्षा अधिक रिक्षांची तोडफोड करण्यात आली. याप्रकरणी काशिगाव पोलिसांनी आतापर्यंत एकूण नऊ जणांना अटक केली आहे तर इतर आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत. मात्र या घटनेचा मास्टर माईड सुकू यादव याच्या विरोधात पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई आत्तापर्यंत करण्यात आली नाही. सुक्कू यादवच्या विरोधात या अगोदर ३२४, ३२६ सारख्या गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे,




असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

डाचकुलपाडा परिसरात सुक्कु यादव उर्फ महाराज या नावाने यादवला ओळखले जाते. सुक्कू यादव व त्याची दोन मुले यांची या परिसरात प्रचंड दहशत आहे. काही दिवसापूर्वीच भाजपमध्ये प्रवेश केल्याने अधिकच सुक्कू यादवची दादागिरी वाढल्याचे स्थानिकांचे मत आहे. सुक्कू यादव डाचकुलपाडा परिसरातील पाणी माफिया म्हणून ओळखला जातो. अनधिकृत रित्या त्याने तीन ते चार बोरिंग मारले आहेत व अनेक वषार्पासून त्या ठिकाणी पाण्याची विक्री करत आहे. या अनधिकृत बोरिंगवर पालिका प्रशासन कधी कारवाई करणार हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे.

या हाणामारीच्या घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, स्थानिक भाजप आमदार नरेंद्र मेहता, भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या तसेच मुस्लिम समाजाचे नेते वारिस पठाण यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करत कारवाईची मागणी केली आहे. सुक्कू यादव याने या परिसरात अनधिकृत पाणी विक्री, अनधिकृत बांधकाम या अवैध धंद्याच्या माध्यमातून प्रचंड संपत्ती कमावली आहे. त्याची चौकशी देखील झाली पाहिजे आणि सुक्कू यादव सारख्या गुंडावर पोलिसांनी कठोर कारवाई करावी अशी मागणी मंत्री सरनाईक यांनी केली आहे.

"एक विशिष्ट समाजाचा गट सकाळी साडेचार वाजता धारदार शस्त्र, दांडके हातात घेऊन एका कुटुंबावर हल्ला करण्यासाठी येतो हे चुकीच आहे. पक्षाचा कार्यकर्ता असल्याने सर्व पक्षांकडून राजकारण सुरू आहे. पोलीस योग्य ती चौकशी करून कारवाई करतील."
**-नरेंद्र मेहता, भाजप, आमदार**

"सुक्कू यादव विरोधात पोलिसांनी मकोका अंतर्गत कारवाई करावी व त्याला तडीपार करावे अशी मागणी आहे."
**-रामभवन शर्मा, स्थानिक नागरिक**

"संबंधित व्यक्तीचा रेकॉर्ड तपासून करून कारवाई करण्यात येईल."
**-राहुल चव्हाण(भा.प्र.से.)पोलीस उपायुक्त, मिरा भाईंदर**

"सुक्कू यादव सारखे कुख्यात गुन्हेगार सर्रास या पक्षातून त्या पक्षात फक्त स्वतःची दादागिरी वाढवण्यासाठी जात असतात. अश्या गुंडावर पोलिसांनी कडक कारवाई करावी."
**-सचिन साळुंखे, स्थानिक नागरिक**

## जिल्ह्यात अवकाळी पाऊस जोरदार बरसला

**■वसई। प्रतिनिधी,**

हवामान विभागाकडून पुढील काही दिवस पालघर जिल्ह्यात पावसाच्या हलक्या सरी बरसणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. त्यानंतर शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी देखील पावसाने हजेरी लावली. दिवाळीच्या दिवसात शहरात झालेल्या आतषबाजीमुळे तसेच रस्त्यावरील धुळीमुळे वसई विरारमधील हवेची गुणवत्ता खालावली होती. पण शुक्रवारपासून शहरात सुरू झालेल्या अवकाळी पावसामुळे हवेची गुणवत्ता सुधारली असून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाकडून पुढील काही दिवस शहरात पावसाच्या हलक्या सरी बरसणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. त्यानुसार वसई विरार शहरात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावायला सुरुवात केली आहे. या अवकाळी पावसामुळे दिवाळीदरम्यान फोडण्यात आलेल्या फटाक्यांमुळे तसेच वाढलेल्या दळणवळणामुळे खालावलेल्या हवेच्या गुणवत्तेत बराच फरक पडला आहे. नरकचतुर्दशी (२१ ऑक्टोबर) दिवशी १७५ या धोकादायक पातळीवर पोहोचलेला हवेचा गुणवत्ता निर्देशांक आता ५३ इतका नोंदवण्यात आला आहे. परिणामी शहरातील वायू प्रदूषणातही घट झाली आहे.

## यंदाच्या दिवाळीत ६१ विनापरवाना फटाके विक्रेत्यांवर गुन्हे दाखल

**■वसई। प्रतिनिधी,**

दिवाळीला वसई विरार- मिरा भाईंदर शहरात ठिकठिकाणी विना परवाना फटाके विक्रीची दुकाने उभारण्यात आली होती. काही दुकाने अक्षरशः दाटीवाटीच्या भागात होती. अशा विनापरवाना दुकानांवर पोलिसांनी कारवाई करीत गुन्हे दाखल केले आहेत. यंदाच्या दिवाळीत ६१ विनापरवाना फटाके विक्रेत्यांवर गुन्हे दाखल झाले असून त्यांच्याकडून ५ लाख ३८ हजारांचे फटाके जप्त करण्यात आले आहेत. काही दुकाने ही अत्यंत दाटीवाटीच्या भागातही होती. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता होती. अशा विना परवाना फटाके विक्री करणाया विक्रेत्यांवर वसई- विरार, मिरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाने कारवाई केली आहे.

दिवाळीच्या काळात फटाके विक्री करण्यासाठी तात्पुरता स्वरूपात परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे असते. याशिवाय अग्निसुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागाची परवानगी घ्यावी लागते. फटाके विक्रीसाठी वसई, भाईंदर परिसरात पालिकेने निश्चित केलेल्या जागेत फटाके विक्रीसाठी परवानग्या देण्यात आल्या होत्या. मात्र तरी सुध्दा विनापरवाने बेकायेदशीरपणे फटाके विक्रीची दुकाने जागोजागी थाटली होती. शहरात विविध ठिकाणच्या रस्त्यावर, फुटपाथ, रस्त्याच्या कडेला दुकाने उभारली आहेत. काही विक्रेत्यांनी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच ही दुकाने उभारल्याने त्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात भाईंदरमध्ये ५ गुन्हे, वसईत ३२ गुन्हे, तर विरारमध्ये २४ असे एकूण ६१ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्याकडून ५ लाख ३८ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## मुंबई महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ५० कोटींचे १९ हजार नवीन टॅब

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिका शाळांमधील इयत्ता नववीच्या मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषिक १९ हजार ३१७ विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण देण्यासाठी ४९ कोटी १९ लाख रुपये खर्चून नवीन टॅब खरेदी करणार आहे. एका टॅबच्या खरेदीवर पालिका किमान १५ हजार ५५० रुपये खर्च करणार आहे. महापालिका विद्यार्थ्यांसाठी स्किल कन्सल्टींग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत या टॅबची खरेदी करण्यात येणार आहे. सदर कंपनी केवळ टॅब खरेदी केल्यावर ई-कंटेंट आणि



**अशी होणार टॅबची खरेदी**
- टॅबची एकूण संख्या - १९,३१७
- टॅबची किंमत (प्रति टॅब) - १५,५५०
- ई-कंटेंटची किंमत - १,९७०
- एकूण प्रकल्प खर्च - ४९ कोटी १९ लाख
- पुरवठादार कंपनी - स्किल कन्सल्टींग प्रा. लि.
- हमी कालावधी १ वर्ष अधिक ४ वर्षे अतिरिक्त देखभाल

चार वर्षांची देखभाल आदी बाबी देखील पाहणार आहे. त्यासाठी या कंपनीसोबत तसा करार करण्यात आला आहे. प्रत्येक टॅबला एक वषार्ची मूलभूत हमी व चार वर्षांची अतिरिक्त हमी देण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेतील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रथम सन २०१५-१६ मध्ये टॅब वाटप करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा २०१७-१८ मध्ये १८,०७५ टॅब खरेदी करून वाटण्यात आले होते. या टॅबचे देखभाल कालावधी (२०१८ ते २०२३) संपल्याने आता नवीन टॅब खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात नवीन टॅबचे वाटप करण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेने डिजिटल शिक्षणासाठी प्रथम व्हर्च्युअल क्लासरूम सुरू करून त्याद्वारे आधुनिक शिक्षण देण्यास प्रारंभ केला. महापालिका शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब, सर्वसामान्य वर्गातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती ही खूपच हलाखीची असते. त्यामुळे त्यांना खासगी शाळांमध्ये डोनेशन देऊन, ॲडमिशन घेऊन अवाजवी फी भरणे त्यासाठी हजारो आणि लाखो रुपये खर्च करणे परवडत नाही. त्यामुळे त्यांना स्वतःच्या पैशांनी टॅब खरेदी करणे देखील परवडणारे नाही. त्यामुळे पालिका शाळांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना टॅब खरेदी करून त्याचे वाटप करण्यात आले.

## १७ किमीची भूमिगत सफर! मेट्रो लाईन ११ चा केंद्राकडे प्रस्ताव आणिक डेपो बनणार बहुस्तरीय ट्रान्झिट हब

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील पूर्व उपनगरांपासून दक्षिण मुंबईपर्यंत सुलभ प्रवासाचा मार्ग मोकळा होण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकण्यात आले आहे. सायनमधील आणिक डेपोला प्रतिष्ठित गेटवे ऑफ इंडियाशी जोडणाऱ्या मेट्रो लाईन ११ प्रकल्पासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ने केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. सुमारे १७.४ किलोमीटर लांबीचा हा कॉरिडॉर पूर्णपणे भूमिगत असेल आणि त्याचा अंदाजे खर्च २३,४८७ कोटी रुपये इतका असणार आहे. हा कॉरिडॉर टटफ्ळ्अ च्या वडाळा-ठाणे-कासरवडवली (मेट्रो लाईन ४) प्रकल्पाचा विस्तार मानला जात असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ही मुंबईची दुसरी पूर्णपणे भूमिगत मेट्रो लाईन ठरेल.

### दक्षिण मुंबईतून पूर्व उपनगरांपर्यंत अखंड जोडणी

ही प्रस्तावित मेट्रो लाईन शहरातील दाट लोकवस्ती आणि वारसा असलेल्या भागांतून जाणार आहे. यात वडाळा, भायखळा, नागपाडा, भेंडी बाजार, क्रॉफर्ड मार्केट, हॉर्निमन सर्कल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस यांचा समावेश असेल. अखेरीस हा मार्ग गेटवे ऑफ इंडिया येथे संपेल. टटफ्ळछ च्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मागार्ची रचना जवळपास अंतिम टप्प्यात आहे आणि संस्थेने जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था कडून आर्थिक साहाय्य मिळवण्यासाठी विनंती केली आहे. केंद्र सरकारकडून प्रकल्पाच्या तांत्रिक आणि आर्थिक आराखड्याचा आढावा



घेतल्यानंतर औपचारिक मंजुरी अपेक्षित आहे.

### आणिक डेपो बनणार बहुस्तरीय ट्रान्झिट हब

सायनमधील आणिक डेपो हा या मेट्रोसाठी मुख्य कार डेपो असेल. डेपोचे रूपांतर बहुस्तरीय पार्किंग आणि ट्रान्झिट हबमध्ये करण्यात येणार असून, येथे बेस्ट बसेससाठी जोडणी, आधुनिक पार्किंग व्यवस्था आणि व्यावसायिक सुविधा असतील. हे मुंबईतील डेपो पुनर्विकास आणि एकात्मिक नागरी नियोजनाच्या प्रयत्नांना गती देणारे ठरेल.

### वडाळा स्टेशनवर इंटरचेंज सुविधा

या लाईनमध्ये वडाळा येथे इंटरचेंज स्टेशन प्रस्तावित आहे. त्यामुळे दक्षिण मुंबई आणि पूर्व उपनगरांमध्ये प्रवास करणाऱ्यांसाठी अखंड आणि वेगवान कनेक्टिव्हिटी मिळेल. विद्यमान रेल्वे मार्गांपासून वंचित असलेल्या भागांना या प्रकल्पामुळे प्रथमच मेट्रो नेटवर्कचा लाभ मिळेल. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासही मदत होईल.

दिवाळीच्या काळात टटफ्ळछ ने अंतरिम सल्लागार नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. सल्लागारावर स्टेशन लेआउट निश्चित करणे, तांत्रिक मूल्यांकन, बोगदे डिझाइन, बांधकामाचे नियोजन आणि वाहतूक वळवण्याच्या योजना तयार करण्याची जबाबदारी असेल. महाराष्ट्र सरकारने सप्टेंबर २०२५ मध्ये या प्रकल्पास मान्यता दिली आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजे २२.७ हेक्टर जमीन आवश्यक असून, त्यापैकी २०.३५ हेक्टर सरकारी आणि २.३६ हेक्टर खाजगी मालकीची आहे.

### मुंबईच्या वाहतुकीत क्रांती घडवणारा प्रकल्प

केंद्र सरकारकडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर मेट्रो लाईन ११ चे बांधकाम प्रत्यक्षात सुरू होईल. पूर्ण झाल्यानंतर ही लाईन पूर्व उपनगरांपासून दक्षिण मुंबईपर्यंतचा प्रवास जलद, सोयीस्कर आणि पर्यावरणपूरक बनवेल. तसंच, शहरातील गर्दी कमी करीत शाश्वत शहरी वाहतुकीच्या दिशेने मुंबई एक पाऊल पुढे टाकेल.

**मेट्रो-३ ला मिळणार भुयारी पादचारी मार्गांची जोडणी!**

जेव्हीएलआर ते कफ परेड या भुयारी मेट्रो-3कडे अधिकाधिक प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) आणि मुंबई महापालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून मोठमोठी व्यावसायिक, रहिवासी संकुले भुयारी पादचारी मार्गांनी मेट्रो-३ला जोडण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या आठ प्रस्तावांना मुंबई महापालिकेने मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्यात तीन स्थानके अशा प्रकारे प्रवासीसुलभ करण्यात येणार आहेत. मुंबई महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याबाबत माहिती दिली.

**भूयारी पादचारी मार्ग**

भुयारी पादचारी मागार्चे काम एमएमआरसीएलकडून केले जाणार आहे. महालक्ष्मी रेसकोर्सवर सेंट्रल पार्क तयार झाल्यानंतर मुंबईकरांसह पर्यटकांना तिथपर्यंत सहज जाता यावे, यासाठी महालक्ष्मी रेसकोर्स ते नेहरू सायन्स सेंटरपर्यंत भूमिगत पादचारी मार्ग तयार करण्यात येणार आहे. हा साधारण एक किमीपेक्षा जास्त किमीचा पादचारी मार्ग असेल. याच धर्तीवर मेट्रो-३च्या अन्य स्थानकांशीही भूमिगत पादचारी मार्ग जोडण्याबाबत जुलैमध्ये मुंबई महापालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली होती. मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे (अतिरिक्त कार्यभार), नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्यासह एमएमआरडीए आणि रेल्वेचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## दुबईत भारतीयांची ₹. ८,००,००,००,००० ची मालमत्ता आयकर विभागाच्या धाडीत सर्वच झालं उघड...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

भारतात राहून बेकायदेशीर मार्गाने पैसा कमावणारे अनेकजण एजंटच्या माध्यमातून परदेशात गैरमार्गाने गुंतवणूक करतात. प्राप्तीकर विभागाने नुकत्याच टाकलेल्या एका छाप्यात भारतीयांच्या नावे असलेलं ८०० कोटी रुपयांचं घबाड समोर आलंय. या छाप्यांतून दुबईतील ८०० कोटी रुपयांच्या ३४० मालमत्तांचे काळे पैशांचे जाळे उघडकीस आलंय. बेकायदेशीरपणे दुबईत पैसे ठेवणारे हे भारतीय कोण आहेत? कोणत्या मार्गाने त्यांनी हे पैसे कमावले? या प्रकरणाचा भांडाफो कसा झाला? विस्तर जाणून घेऊया. दुबईत भारतीयांच्या नावे ८०० कोटींची बेहिशेबी मालमत्ता उजेडात आली. मुंबई, ठाणे, पुणे, दिल्लीतील चार एजंटांच्या छाप्यातून ही माहिती मिळाली. आर्थिक घोटाळे, बेहिशेबी उत्पन्न, बँकेतर संस्था आणि क्रिप्टो चलनाच्या माध्यमातून उभे राहिलेली मालमत्ता प्राप्तीकर विभागाच्या रडारवर आलीय., खरेदीदारांना 'सुरक्षित' व्यवहाराची भ्रामक माहिती




देऊन फसवण्यात आल्याचा प्रकार घडलाय.

हे एजंट दुबईतील पंचतारांकित हॉटेल प्रदर्शनांद्वारे खरेदीदारांना आकर्षित करतात. 'काळ्या पैशातही व्यवहार सुखरूप होईल, संयुक्त अरब अमीरात भारतीय यंत्रणांना काही सांगणार नाही' अशी अफवा पसरवतात. सुलभ हप्ते आणि आकर्षक भाडे उत्पन्नाचे आमिष दाखवतात, अशी माहिती पुणे तपास पथकाने दिली. दरम्यान या एजंट्सच्या भरवश्यावर भारतीय खरेदीदार निश्चिंत होऊन रोकड किंवा क्रिप्टोद्वारे मालमत्ता खरेदी करतात.

माहितीच्या आधारे आयकर विभागाने मुंबई, ठाणे, पुणे आणि दिल्लीतील प्रत्येकी एका एजंटवर छापे टाकले. यात ३४० मालमत्तांच्या कागदपत्रे, मोठ्या प्रमाणात रोकड आणि परदेश खरेदींचे रेकॉर्ड सापडले. दुबईतील हे मालमत्ते बेहिशेबी उत्पन्नाने आणि बँकेतर मार्गांनी विकत घेतले गेले असल्याचे निदान झाले. खरेदीदारांना भाड्याने कमाईचे स्वप्न दाखवून, हे एजंट काळ्या पैशांचा फेरा उभा करतात. विभागाने या पुराव्यांची शहानिशा सुरू केली असून, फेमा आणि काळा पैसा प्रतिबंधक कायद्यांतर्गत दंडात्मक कारवाईची तयारी आहे.

या ३४० मालमत्तांचे मालक प्रामुख्याने भारतीय असून, त्यांच्यावर प्राप्तीकर कायद्यांतर्गत चौकशी आणि दंड उघड होणार आहे. हे खरेदीदार रिटर्नमध्ये मालमत्ता नोंदवत नाहीत, ज्यामुळे कर चुकवे होते, असे विभागाने सांगितले. या प्रकरणाने दुबईतील मालमत्ता बाजारातील काळ्या पैशांचा प्रवाह उघड झाला असून आर्थिक अपराधांना चालना मिळत असल्याचे तज्ञांचे मत आहे.

## पुणे पदवीधर निवडणुकीसाठी इच्छुकांची भाऊगर्दी
# भाजपने कसली कंबर... मविआत इच्छुकांची मोर्चेबांधणी

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुणे पदवीधर निवडणुकीसाठी आतापासूनच इच्छुकांची भाऊगर्दी पाहायला मिळत आहे. मागील निवडणुकीत महाविकास आघाडीकडून झालेला पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागल्याने ही उणीव भरून काढण्यासाठी यंदा पक्षाने चांगलीच कंबर कसली आहे. पुणे पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी भाजपात प्रवेश केल्याने समीकरणे बदलली असून, भाजपमधील इच्छुकांना चाप बसला आहे. मात्र, महाविकास आघाडीकडे उमेदवारीसाठी इच्छुकांनी मोचेर्बांधणी सुरू केली आहे.

मागील निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतून अरुण लाड यांना उमेदवारी मिळाली. त्यांच्या विरोधात भाजपचे संग्रामसिंह देशमुख, मनसेच्या रुपाली पाटील, जनता दलाचे शरद पाटील, अपक्ष डॉ. श्रीमंत कोकाटे, बहुजन आघाडीचे सोमनाथ साळुंखे असे उमेदवार होते. मात्र, खरी लढत महाविकास आघाडी व भाजपमध्ये झाली. एकूण झालेल्या मतांपैकी २ लाख २८ हजार २५९ मते वैध ठरली, तर तब्बल १९ हजार ४२८ मते अवैध ठरली. विजयासाठी १ लाख १४ हजार १३१ कोटा निश्चित करण्यात आला होता. महाविकास आघाडीचे उमेदवार अरुण लाड यांनी पहिल्याच फेरीत १ लाख २२ हजारांहून अधिक मते घेत एकहाती विजय मिळवला होता. त्यांचे विरोधक भाजपचे उमेदवार संग्रामसिंह देशमुख यांना केवळ ७३ हजार एवढी मते मिळाली. लाड यांचा ४८ हजार ८२४ मतांनी विजय झाला.

पुणे पदवीधर मतदारसंघात पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे येतात. भाजपकडून शरद लाड हे इच्छुक आहेत. तर दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे




**कोणाला मिळणार तिकीट?**

आमदार जयंत पाटील यांचे स्नेही व माजी खासदार एस. डी. पाटील यांचे नातू ॲड. धैर्यशील पाटील निवडणुकीसाठी रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. ते शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य होते. मंत्री हसन मुश्रीफ यांचे निष्ठावंत समर्थक प्रताप माने हे या निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. राष्ट्रवादीलाच जागा मिळावी, यासाठी येथील नेतेमंडळी अग्रेसर आहेत. जनसुराज्यचे सुमित कदम यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. मनसेकडूनही काहीजण इच्छुक आहेत. उमेदवारी मिळाली नाही, तर काहीजण अपक्षही लढण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे ही निवडणूक आतापासूनच रंगत असल्याचे दिसून येत आहे.

आणि जनसुराज्य पक्षातर्फे अनेक जण इच्छुक आहेत. नव्याने मतदार नोंदणीचा धडाका सुरू झाला आहे. प्रत्येक पक्षाचे गटनेते पदवीधरांची मत नोंदणी अधिक कशी होईल, याकडे लक्ष देत आहेत. आमदार अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड यांनी पुणे पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लक्षात घेऊन भाजपात प्रवेश केला आहे. आता त्यांना भाजपमधून उमेदवारी मिळते का ?, याबद्दल औत्सुक्य आहे. आमदार लाड यांच्या जागी महाविकास आघाडीसाठी सध्या तरी शिक्षकेतर संघटनेचे शिवाजीराव खांडेकर हे दावेदार मानले जात आहेत.

## इचलकरंजी येथील १८ गंभीर गुन्हे दाखल असलेल्या कुख्यात एस. एन. गँगवर अखेर 'मकोका'

**■कोल्हापूर। प्रतिनिधी,**

इचलकरंजी येथील कुख्यात 'एस. एन. गँग'वर कोल्हापूर पोलिसांनी मोठी कारवाई केलीय. अखेर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करत 'एस. एन. गँग'च्या सहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गँगविरुद्ध खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, खंडणी वसुली यांसारख्या १८ गंभीर गुन्ह्यांची नोंद असून, सुरक्षितता धोक्यात आल्याने पोलिसांनी हा कडक निर्णय घेतला आहे.

### सहा जणांचा समावेश

या टोळीचा मुख्य म्होरक्या सलमान राजू नदाफ (वय २५, परीट गल्ली, गावभाग) असून, अन्य सदस्यांमध्ये अविनाश विजय पडीयार (वय १९), अरसलान यासीन सय्यद (वय १९), यश संदीप भिसे (वय १९), रोहित शंकर आसाल (वय १९) आणि अनिकेत विजय पोवार (वय २२) यांचा समावेश आहे. या टोळी विरोधात खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, खंडणी वसुली, शस्त्रास्त्रासह गर्दीत मारहाण, बंदी आदेशाचा भंग असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

### फटाक्याच्या वादातून दहशत

१५ जुलै रोजी एका ब्युटी




पार्लरसमोर फटाके फोडत असताना वाद निर्माण झाला. त्यावरून सलमान नदाफ आणि गँगने दहशत दाखवत पार्लरची तोडफोड केली. याबाबत गावभाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधीक्षक योगेश कुमार यांनी घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन, अपर पोलिस अधीक्षक आण्णासाहेब जाधव आणि उपविभागीय अधिकारी विक्रांत गायकवाड यांना तत्काळ कारवाईचे आदेश दिले.

### मोक्का अंतर्गत मंजुरी

पोलीस निरीक्षक महेश चव्हाण यांनी गँगच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा सखोल तपास केला. त्यावर आधार घेत मोक्का कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवण्यात आला. या प्रस्तावास विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी मंजुरी दिली आहे. यासोबतच पुढील तपासासाठी विक्रांत गायकवाड यांच्या टीमकडे हे प्रकरण सोपवण्यात आले आहे.

या कारवाईमुळे इचलकरंजी शहरातील गुन्हेगारी टोळ्यांना साप बसण्यास मदत होणार आहे. स्थानिक पोलिस दल आणि गुन्हे अन्वेषण शाखेच्या या कामगिरीमुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. तसेच पोलिसांनी पुढे येऊन गुन्हेगारीविरोधात तक्रार दाखल करण्याचेही आवाहन केले आहे. दरम्यान ही कठोर कारवाई वेळीच घडल्याने परिसरात वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळण्यास मदत होईल, असा विश्वासही पोलिसांनी व्यक्त केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com